# छत्रपती शिवाजी महाराजांच्या केंद्रीय प्रशासनात अष्टप्रधान मंडळची भुमिका

**प्रा. डॉ. सुरेश एन काळे**
**इतिहास विभाग प्रमुख**
**मार्गदर्शक व संशोधक**
**एच. बी. टी. कला आणि वाणिज्य, महाविद्यालय,**
**न्यु सुभेदार ले—आऊट नागपूर ४४००२४**
**मो. नं. ९८५०३४६१५६**
इमेल- sureshkale1972@reddifmail.com

प्राचीन स्मृत्यादी ग्रंथांनी धर्मास श्रेष्ठतम मानून राज्य व समाजाची सर्व व्यवस्था त्या कक्षेतून मर्यादित केली असल्याने राजास राजधर्माचे पालन करुन धर्म साध्य करावयाचा होता. राजधर्मामध्येच राष्ट्रपालन, प्रजानिवारण, धर्मपालन म्हणजे संस्कृती संवर्धन याचा समावेश होता. त्या काळात राज्यकारभार पाहण्यासाठी ‘ प्रधानांची’ नेमणूक केली जात होती. रामायण, महाभारत, मनुस्मृती व शुक्रनीती इत्यादी प्राचीन ग्रंथात ‘प्रधानांचा’ उल्लेख सापडतो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या समकालीन शासन पध्दतीचा अभ्यास केला असता, महाराजांची शासन पध्दत त्यांच्यापेक्षा वेगळी असल्याचे स्पष्ट होते. कारण शिवप्रशासनाचा मुख्य पाया ‘लोककल्याण’ साधणे हा होता, तर इतर शासक लोककल्याणाच्या बाबतीत उदासिन होते. लोककल्याण साधण्यासाठी कार्यक्षम प्रशासन असणेही गरजेचे होते. त्यामुळे एकटा मनुष्य कितीही विद्वान असला तरी तो राज्याचे संपूर्ण प्रशासन चालवू शकत नाही. त्यासाठी मंत्र्यांची गरज असते. राजास प्रधान मंडळ निर्माण करावे लागे व त्यांच्याद्वारा कार्याची वाटणी करुन शासन चालवावे लागे [१].

शिवाजी महाराजांनाही राष्ट्र संरक्षण व जनतेचे राज्य निर्माण करण्यासाठी योग्य प्रशासन निर्माण करावे लागले. त्यासाठी त्यांनी राज्यकारभारात मदत करण्यासाठी आठ विभाग निर्माण करुन त्यावर एका प्रधानाची नियुक्ती केली, त्यास ‘अष्टप्रधान मंडळ’ असे म्हणतात. सभासद बखरीत मुख्य प्रधान, सेनापती, अमाल, सचिव, मंत्री, सामंत, पंडितराव आणि न्यायधीश ही आठ नावे आढळतात.

छत्रपती हे संपूर्ण स्वराज्याचे प्रमुख होते. मात्र राज्यकारभारच्या सोयीसाठी स्वराज्याचे विभाजन केंद्रिय प्रशासन, प्रांतीय प्रशासन आणि स्थानिक प्रशासन असे करण्यात आले होते. केंद्रीय प्रशासनात दोष निर्माण झाले की त्याचे परिणाम संपूर्ण साम्राज्यावर होतात हे शिवाजी महाराज जाणून होते म्हणून त्यांनी राज्याचा कारभार सुरळीत चालावा, यासाठी आपल्या पूर्वसुरींचा आधार घेऊन व गरजेनुसार नवीन गोष्टींचा भर घालून स्वराज्याची उत्कृष्ट केंद्रिय प्रशासन व्यवस्था निर्माण केली. त्यामध्ये अष्टप्रधान मंडळ व त्यांचा अधिकारी वर्ग, अठरा कारखाने व बारा महाल यावरील अधिकारी वर्ग यांचा समावेश होता. स्वराज्याचा अंतिम कारभार हा छत्रपतींच्या हाती होता. छत्रपतीच्या अनुपस्थितीत स्वराज्याच्या कारभाराची जबाबदारी केंद्रिय प्रशासनाकडे येत असल्याने स्वराज्यासाठी केंद्रिय प्रशासनाची भूमिका किती महत्वाची होती. याची कल्पना येते.

अष्टप्रधान मंडळ म्हणजे स्वराज्याचे मंत्रिमंडळ होय. हा महाराजांच्या मुलकी कारभाराचा महत्त्वाचा पैलू आहे. तत्कालीन इतर राजवटीतही मंत्रिमंडळ होते, परंतु त्या राज्यांमध्ये लष्करी सत्ता आणि दिवाणी सत्ता ह्या वेगवेगळया होत्या आणि कोणत्याही राज्यात लष्करी सत्ता ही दिवाणी सत्तेच्या ताब्यात नसेल, तर तेथे जनकल्याणाकडे दुर्लक्ष होते. उलट जेथे लष्करी सत्ता ही दिवाणी सत्तेच्या ताब्यात असते, तेथे जनकल्याणाची मर्यादा वाढलेली असते, शिवाजी महाराजांची कार्यपध्दती बघितली असता, वरील उक्तीचे महत्व पटते. कारण, अष्टप्रधान मंडळामध्ये सेनापती एकच असला, तरी सहा प्रधानास प्रसंगी लष्करी कार्य करावे लागत असे. त्यामुळे स्वराज्यातील लष्करी सत्ता ही दिवाणी सत्तेच्या ताब्यात दिसते. तरीही अष्टप्रधान मंडळाचा मुख्य उद्देश हा दिवाणी कारभार चालविणे हाच असून शिवाजी महाराज देखील आपले मुख्य कर्तव्य तेच मानत होते.[२]

अष्टप्रधान मंडळाची स्थापना ही एकाचवेळी झाली नसून सुरुवातीला शहाजी राजांनी चार प्रधान नियुक्त केले. त्यानंतर शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या वाढत्या विस्तारासोबत कारभार पाहण्यासाठी प्रधानांची गरज निर्माण झाल्याने आणखी चार विभाग निर्माण करुन त्यावर प्रधानांची नियुक्ती केली. त्यामुळे शिवाजी महाराजांनी परंपरेने चालत आलेल्या नियमानुसार स्वराज्याचा राज्यकारभार पाहण्यासाठी आणि गरजेनुसार अष्टप्रधान मंडळ निर्माण केल्याचे स्पष्ट होते. शिवाजी महाराजांचे अष्टप्रधान मंडळ हे प्राचीन राजनीतीवर ग्रंथ आणि मुस्लिम मंत्र्यांशी काही प्रमाणात जुळणारे आहे. तसेच राज्यकारभार करताना शिवाजी महाराजांना राजनीतीपर ग्रंथ साह्यभूत ठरली. राज्यभिषेकापर्यंत अष्टप्रधान मंडळ निर्माण झाले असल्याने राज्यभिषेकाप्रसंगी फक्त अष्टप्रधान मंडळासोबत इतर अधिकाऱ्यांना अधिकाराची वस्त्रे देऊन त्यांचा बहुमान केला व अष्टप्रधानांची कर्तव्ये निश्‍चित केली गेली.[३] तसेच 'क्षत्रिय कुलावंतास राजा शिवछत्रपती' इत्यादी शब्द जोडूने आपले नाव लिहायची परंपरा घातली.[४]

अष्टप्रधान मंडळाची कर्तव्ये:

अष्टप्रधान मंडळाच्या कामकाजाचे स्वरुप कसे होते? त्यांना कोणकोणती कामे करावी लागत होती? याविषयीची माहिती राज्याभिषेकाच्या वेळी लिहिलेल्या 'कानुजाब्ता' मध्ये रावबहादूर का. ना. साने यांनी प्रसिध्द केली आहे. त्यामध्ये अष्टमंडळाच्या कर्तव्यासोबत खाजगी अधिकारी व अठरा कारखान्याचे अधिकारी यांचीही कर्तव्ये दिली आहेत. कानुजाब्त्यात एकूण २० कलमे आहेत. ती शिवकालीन राजनीती व रणनीती या ग्रंथात दिलेली आहेत.[५] मल्हारराव चिटणीस यांनी 'श्री शिवछत्रपतींचे सप्तप्रकरणात्मक चरित्र' या बखरीत देखील अष्टप्रधान मंडळाची कर्तव्ये सांगितली आहे. ती पुढील प्रमाणे.

(१) पेशवा / मुख्य प्रधान:—

मुख्य प्रधान यांणी सर्व राजकार्य, मंत्र, राजकारण करावे, सर्वांशी समान बुध्दीने, सर्वांचे अनुमते, कोण्हाशी व्देषबुध्दी न करिता सर्वांस घेऊन चालावे. राजहित ते प्राणाहून अधिक, आपला स्वार्थ तिळप्राय न पाहात, दक्ष (तेने) व विचक्षणपणे, निरालस्य, सर्वकाल, करीत असावे. सेना घेऊन युध्दादिप्रसंग शूरत्वे करुन राज्य नित्य नूतन साध्य करावे. शत्रूंची बातमी राखून पराभव करावे. राजपत्रे होतील त्यांजवर मुद्रा मुख्य प्रधान याणी आपली दुसरी करावी.

(२) सेनापती:—

सेनापती यांणी सर्व सेना रक्षण करुन, त्यांचे मानसन्मान रक्षून, वेतन समयाचे समयास पाववून, राजास (राज्यास) ज्यांणी जशी सेवा केली ते निवेदन करुन, त्यास वेतन, बक्षिसे देवावी, सर्व सैन्य घेऊन युध्दादिप्रसंग करावे.

३) मुजूमदार / अमात्य:—

अमात्य यांणी सर्व राज्यांतील आयव्यय जमाखर्च हाईल तो लेखनाधिकारी यांजपासून चौकशीने लिहिणे करवून, आपण पाहून, राजास निवेदन करावे. राजपत्रांवर व खर्चाचे हिशोब सर्व राज्यांतील, महालातील यांजवरि चिन्हे करावी. राजास नित्य निवेदन करावे, येविशी दक्ष निपुण असावे, व मोठी मोठी राजकार्ये करुन युध्दादिप्रसंग सैन्य घेऊन करावे.

४) सुरनीस / सचिव:—

सचिव यांणी राजपत्रे होतील त्यांत न्युनाधिक अक्षर मजकूर यांचा शोध करुन नीट करवावे, व तसेच महाल, परगणे, यांचे हिशेबाचेही शोध करुन राजपत्रावरि 'संमत' करुन बारचिन्हे रुजू करावे. युध्ददिप्रसंग (करुन) राजहित ते करीत असावे.

५) मंत्री / वाकेनिस:—

मंत्री यांणी मंत्रकार्यात निपूण असोन राजकारणे राखीत असावी. राजांनी जे जे कर्म, कृत्य केले, त्याची दिनचर्या, वाका (वर्तमान) लिहून ठेवावा. आमंत्रण, निमंत्रण, राजाचे भाजनादि (काचे) साहित्य, पदार्थ काय पाहिजे हे पाहात असावे, व राजकार्याविषयी दक्ष असोन युध्दादिप्रसंग करावे. राजपत्रावरि 'संमत' अैसे चिन्ह करावे.

६) सुमंत / डबीर:—

सुमंत याणी सर्व परराज्यातील राजकारणे, शत्रूंचे, संधिविग्रह पाहून बातमी राखणे, व वकील येतील जातील त्यांचे सन्मान वगैरे करावे. सर्व राजास निवेदन करुन आज्ञेने राजकार्य (व) युध्दादिप्रसंग करावे. राजपत्रावरि 'संमत' अैसे चिन्ह करावे.

७) पंडीत:—

पंडितराव याणी धर्माधिकार सर्व चालवावे पंडितजन यांचे विद्वान ब्राम्हण यांचे सन्मान करावे. धर्माधर्म विवक्षा, यज्ञ करणे व शांतिकपौष्टिक (अरिष्टनिरसनाचे विधी) नित्य नैमित्तिक, कालाचे काली सुचवून करावावे. दंड कोणास कसा करावा हा धर्म पाहाणे, प्रायश्चित्ताचे निर्णय व त्याची पत्रे होतील त्याजवर राजपत्रावर 'सुमंत' ऐसे चिन्ह करावे.

८) न्यायाधीश:—

न्यायाधीश याणी सर्व राज्यांतील न्याय—अन्याय वृत्तीचे (निर्वाहसाधन) व भूमीचे— यांचे सर्व काल राजास कांही एक दोष न लागे ऐसे न्यास करणार अधिकारी व शास्त्रज्ञ ब्राम्हण नेमिले त्यांचे विचारे धर्मता (धर्मत:) न्याय करुन सर्व काल राजास निवेदन करावे. पाहात असावे. न्यायाची निवाडपत्रे होतील त्याजवर 'संमत' अैसे चिन्ह करावे.[६]

वरील प्रमाणे अष्टप्रधान मंडळाची कर्तव्ये बघितली असता ते एका विभागाचे प्रमुख असले, तरी तीन प्रधान हे प्रधानासमवेत सरसुभेदारही होते. त्यांच्यावर सरसुभ्यास कामकाजाची जबाबदारी होती. सहा प्रधानांना प्रसंगी लष्करी कार्यावर जावे लागे, तर आठही प्रधानांना न्याय निवाडयाचे कार्य करावे लागत असे. तसेच प्रत्येक प्रधानास आपल्या विभागाच्या पत्रावर निशाणी द्यावी लागत असल्याने तो त्यास जबाबदार रहात असे. यावरुन स्वराज्याच्या कार्याची महत्वाची जबाबदारी अष्टप्रधान मंडळास पार पाडावी लागत असल्याचे स्पष्ट होते.

**अष्टप्रधान मंडळाच्या अनुपस्थितीत राज्यकारभाराची व्यवस्था:—**

अष्टप्रधानांच्या कर्तव्यामध्ये तीन प्रधानांवर सरसुभ्याची व्यवस्था सोपविण्यात आली होती. तसेच आठपैकी सहा प्रधानांना लष्करी माहिमेवर जाणे बंधनकारक करण्यात आले होते. त्यामुळे प्रधान जेव्हा गैरहजर अथवा लांब पल्ल्याच्या मोहिमेवर राजधानीबाहेर असत, तेव्हा त्यांच्या अनुपस्थितीत त्यांचे प्रतिनिधी त्यांचा कारभार पाहत असत.[७] तसेच जाबत्यारुनही स्पष्ट होते की, ''अष्टप्रधानांच्या अधिकारातील परगणे आणि बाजारपेठांची व्यवस्था पाहण्यासाठी आणि प्रांत प्रमुख प्रधान लष्करी मोहिमेवर असताना साहाय्यक म्हणून काम पाहणाऱ्या दरकदारांनी हुजुरांच्या नावे कारभार करावा आणि मोहिमेवर असताना देखील असाच व्यवहार करावा. त्याच्या जागी नेमलेल्या मुतालिकांनी (कारभारी) त्याचे कामकाज पाहावे. त्यांनी स्वत: राजदरबारी हजरी लावावी''.[८]

अष्टप्रधान मंडळाच्या गैरहजेरीत त्यांचे प्रतिनिधी म्हणून जे कारभारी काम पाहत असे. त्यांची नेमणूक राजा करीत असे. प्रधानांना तो अधिकार नव्हता, मात्र त्यासाठी प्रधानांची संमती घेतली जात होती अथवा नाही याविषयीचाी माहिती मिळत नाही.

अष्टप्रधान मंडळातील सदस्य :

शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाप्रसंगी सिंहासनास अष्ट खांब जडीत केले होते. त्या अष्ट खांबांजवळ अष्टप्रधान उभे राहिले होते. त्यांची नावे सभासदाने दिली आहे, ती पुढील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) पेशवा/मुख्य प्रधान | — | मोरोपंत, त्रिंबकपंतांचे पुत्र |
| २) मुजूमदार/अमात्य | — | नारो निळकंठ व रामचंद्र निळकंठ |
| ३) सुरनीस/सचिव | — | अण्णाजीपंत |
| ४) मंत्री/वाकेनिस | — | दत्ताजी त्रिंबक |
| ५) सेनापती | — | हंबीरराव मोहिते |
| ६) सुमंत/डबीर | — | त्रिंबकजी सोनदेव यांचे पुत्र रामचंद्रपंत सुमंत |
| ७) पंडित/दानाध्यक्ष | — | रघुनाथ पंडितराव |
| ८) न्यायाधीश | — | निराजी रावजी [९] |

**अष्टप्रधानांचा अधिकारी वर्ग व त्यांची शिस्त:—**

प्रधान हा स्वराज्याच्या एका विभागचा प्रमुख असल्याने अष्टप्रधान मंडळाच्या कचेरीतून स्वराज्याचा कारभार चालत असे. त्यामुळे अष्टप्रधानातील प्रत्येकास वेगवेगळी कचेरी असून दैनंदिन कारभार चालविण्यासाठी त्यांच्या हाताखाली काही अधिकारी अथवा कारकून असत. कृ.अ.

केळूसकर यांनी राजा व अष्टप्रधान मंडळ यांच्यातील कामकाजाचे स्वरुप दिले आहे. त्यामध्ये राजाकडून जाणाऱ्या प्रत्येक खलित्यावर, आज्ञापत्रावर व तहनाम्यावर महाराज व मुख्य प्रधान यांचे शिक्कामोर्तब होऊन आणखी चार प्रधानांचा सहया असे. हया सर्व प्रधानास एक एक मुतालिक दिलेला असून प्रधानांच्या अनुपस्थितीत हा मुतालिक त्यांच्या विभागाचा कारभार पाहत असे. यावेळी प्रधानांचे शिक्कामोर्तब त्यांच्याजवळ असे, मात्र महत्त्वाचा निर्णय त्यांना वरिष्ठांच्या परवानगीशिवाय घेता येत नव्हता. मुतालिकाच्या हाताखाली सात कामदार असत. १) मुजूमदार म्हणजे जमाखर्चाचे काम, २) फडणीस म्हणजे मुजूमदाराचा दुय्यम, ३) सबनीस म्हणजे दप्तरदार, ४) कारखानीस म्हणजे सगळया कोठीची व दानागल्ल्याची व्यवस्था पाहणारा, ५) चिटणीस म्हणजे पत्रव्यवहार करणारा, ६) जामदार म्हणजे खजिनदार, ७) पोतनीस म्हणजे सर्व कोष सांभाळणारा. या सर्व अधिकाऱ्यांच्या हाताखाली पुन्हा त्यांच्या कामाच्या मानाने कमी जास्त कारकून असत. यावरुन मुतालिक हा प्रधानाच्या कार्यालयातील प्रमुख होता. शिवाजी महाराजांनी आपल्या अष्टप्रधान मंडळात सर्व खाती वाटून दिली असल्याने प्रत्येकाला वेगवेगळी कचेरी होती. त्या कचेरीत प्रत्येकाचे अधिकारी असत, त्यांना 'दौलत' म्हणजे 'सरकार' म्हणत.[१०] तसेच शिवाजी महाराजांच्या हाताखाली त्यांचे खासगी चिटणीस वैगेरे अधिकारीही होते. त्यामुळे दौलत आणि खासगी खाते या दोघांनाही एकमेकाशी सहकार्य करुन स्वराज्याचा गाडा हाकावा लागत असे.

सारांश, अष्टप्रधान मंडळाचा कारभार सुरळीत चालावा यासाठी शिवाजी महाराजांनी त्यांच्या हाताखाली अधिकारी वर्ग देऊन त्यांना स्वतंत्र कचेरी दिली. तसेच काम करताना कनिष्ठ व वरिष्ठ अधिकाऱ्यांचे वर्तन कसे असावे? यासाठी नियमावली तयार केली. नियमांचे पालन न करणाऱ्यास शिक्षा केली जात होती. यावरुन शिवाजी महाराजांनी सूक्ष्म निरीक्षण व दूरदृष्टी दिसून येते. कारण, प्रशासनातील सर्व अधिकाऱ्यांमध्ये एकमेकाविषयी द्वेष भावना निर्माण झाली, तर त्याचा परिणाम प्रशासनावर होईल, हे महाराज जाणून होते. म्हणून त्यांनी अधिकाऱ्यांमध्ये समन्वय व एकमेकांविषयी आदर राहावा यासाठी सदर नियमावलीद्वारे प्रयत्न केल्याचे दिसते.

**अष्टप्रधानांचे तैनात अथवा वेतनः—**

६ जून १६७४ रोजी राज्याभिषेकाद्वारे शिवाजी महाराज स्वराज्याचे कायदेशीर छत्रपती बनले. या राज्याभिषेकाप्रसंगी शिवाजी महाराजांनी अष्टप्रधान मंडळाचा शाही बहुमान करुन त्यांच्या तैनाती केल्या. त्यामध्ये मुख्य प्रधान यास १५००० होन, अमात्यास १२००० होन व वरकडास १०००० होन व काही मोकासे व सरदेशमुखी लावून दिली. चिटणीस बाळाजी आवजी यास मंत्रीपद देऊ केले, मात्र त्यांनी ते नम्रपणे नाकारल्याने त्यांना ६००० होन व काही मोकासे लावून दिले. यावेळी चिटणीशी वतन म्हणून वंशपरंपरेने करुन द्यावे, असे बाळाजी आवजी यांचे म्हणणे होते, परंतु तसे पत्र त्यांना दिले किंवा नाही, हे स्पष्ट होत नाही. चिटणीसाशिवाय फडणीस चिमणाजी आवजी यास ३००० होन तैनात लावून दिली. महालदार, कारखानदार वगैरेंना पाचशे, चारशे, तीनशे, दोनशे व शंभर होनाच्या तैनाती करुन दिल्या. तसेच सरदार, पायदळ सेवेकरी यांना योग्यतेनुसार सर्वांस पांच, चार हजार होनांपासून दोनशे, शंभर, पन्नास, पंचवीस व पंधरा होनपर्यंत तैनाती करुन दिल्या.[११] अशाप्रकारे विवेचनात शिवाजी महाराजांनी अष्टप्रधानासह सर्वांना नगदी वेतन, मोकासे व सरदेशमुखी लिहून दिल्या, परंतु कोणासही वंशपरंपरेने वतन दिल्याचे दिसत नाही.

**चिटणीस, फडणीसाचे कार्य:—**

प्रधान मंडळात समाविष्ट नसलेले परंतु अष्टप्रधानाचा दर्जा असलेले अधिकारी म्हणजे 'चिटणीस' (कार्यवाह) आणि 'फडणीस' होय. त्यामध्ये फडणीस हा चिटणीसाच्या हाताखालचा कनिष्ठ अधिकारी होता. चिटणीसने राज्याभिषेकाप्रसंगी, प्रधानांच्यापुढे उजव्या बाजूस चिटणीस व डाव्या बाजूस फडणीस यांनी बसावे, असे म्हटले आहे. त्यानंतर योग्यतेनुसार इतर अधिकाऱ्यांची जागा ठरवून दिलेली होती. त्यानुसार बाळप्रभू चिटणीस आणि नीळ प्रभू पारसनीस हे प्रधानांच्या खालोखाल उभे असलेले दिसतात. यावरून स्वराज्यात चिटणीस व फडणीसास असलेले महत्व स्पष्ट होते. शिवाय शिवाजी महाराजांचा चिटणीस बाळाजी आवजी ही एक असामान्य कर्तृत्ववान व्यक्ती होती. आपल्या विभागाच्या कामकाजासोबतच महाराजांच्या मुखातून पडणारे शब्द टिपून घेण्याची नाजूक कामगिरी त्याच्यावर सोपविण्यात आली होती आणि ती तो चोखपणे बजावत असे. म्हणूनच शिवाजी महाराजांनी बाळाजी आवजीस मंत्रिमंडळातील मंत्रिपद बहाल केले होते, परंतु या थोर मुत्सद्याने ते मोठया विनयाने नाकारल्याचे डॉ. सेन यांचे म्हणणे आहे.

श्री. शिवछत्रपतींचे सप्तप्रकरणात्मक चरित्र या बखरीत मल्हाररावाने चिटणीस व फडणीस यांच्या कार्याविषयी म्हटले आहे की, " चिटणीस पत्रलेखक यांनी सर्व राजपत्रे लिहावी. राजकारणपत्रे लिहावी. राजाचे ह्रदत जाणून तत्काल नाना प्रकारचे, कल्पना करून चतुरपणे लेखन करावे. जे युध्देकरुन, आयासेंकरुन, कार्य होणे ते पत्राचे भाव पाहूनच कार्य होत असावे, ऐसे लेखन करावे. पत्रे येतील त्यांची उत्तरे ल्याहावी. चिटणिशी व फडणिशी पत्रे कोणती कशी लिहावी, दान—पत्रे नांवाची, गांवाचे नूतन इनामाचे, फडणिशीतील पत्रे, लेखक वर्तमान (व) भावी व देशमूख— देशपांडे व तालुकदार ऐंशी, चिटणिशी निवाडापत्रे, प्रायश्चित (पत्रे) वगैरे चिटणिशी, यांचे कानूजाबते ठराव करुन दिले, तसे लिहावे. फडणीस यांणी अमात्यांचे संमते सर्व जमाखर्च लिहिणे, तात्काळ लेहून बहूत सावधपणे रक्षावे. राजास निवेदन करावे. दक्ष विचक्षण गणनक्रियेत असावे. बारा महाल व अठारा कारखाने यांचे अधिकारी यांणी व तालुकदार सुभे, किल्ले यांणी आपापले अधिकार करुन, आपापले हिशेबकितेब लिहून मजमुदप्तरी (वसूल खाते) गुजरावे. त्यांणी एकबेरजी (एकूण जमा) झडती (शोध) करुन सालाचे सालांत दुसरे सालीं समजावीत असावे. ऐसे निबंध बांधून दिल्हे''.[१२]

शिवकालीन चिटणीसाचे कार्य हे छत्रपतींच्या खाजगी सचिवाप्रमाणे होते. तसेच राज्याची सर्व पत्रव्यवहार चिटणीसास पाहावे लागे. चिटणीसाने लिहिलेल्या पत्रातील मजकूर पाहताच अपेक्षित कार्य संपन्न व्हावे अशा पध्दतीचे चतुरपणे लिखाण करावे अशी महाराजांची अपेक्षा होती. चिटणीसाच्या मदतीस काही अधिकारी होते, त्यामध्ये फडणीस एक असून तो चिटणिसानंतरचा अधिकारी असावा. कारण, चित्रगुप्त म्हणतो की, फडणीसाशिवाय इतर कोणताही सरकारी अधिकारी राज्य अनुदान पत्र काढू शकत नसे. तसेच राज्याचा सर्व जमाखर्च हिशोब अमात्याच्या संमतीवरुन फडणीसास तयार करुन राजांकडे निवेदन करावे लागत असे. यावरुन फडणीसाचे राज्यकारभारातील महत्त्व लक्षात येते.

तळटीप:

(१) कुलकर्णी अ.रा., खरे ग. ह. (संपा.), मराठयांचा इतिहास, खंड—१ कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, २००६, पृ. २७४.

(२) गर्गे स.या. (सपा.) मराठी रियासत, खंड १, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९८८—८९ पृ. ३६२.

(३) हेरवाडकर र. वि. (संपा.), मराठी बखर, व्हीनस प्रकाशन पुणे, १९७५ पृ. २२३—२२८.
(४) केपन डेव्हिड (अनू.) मराठयांची बखर, वरदा बुल्स प्रकाशन, पुणे २०१५ पृ. ७७.
(५) कुळकर्णी श्री. रे. 'शिवकालीन राजनीती आणि रणनीती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९९४, पृ. ४३.
(६) हेरवाडकर र. वि. (संपा.) पुर्वोक्त पृ. २२८—२२९.
(७) भावे वा. कृ. 'शिवकालीन महाराष्ट्र', वरदा प्रकाशन, पुणे २०१० पृ. १२४
(८) कुलकर्णी विजया (अनु.) मराठयांची प्रशासन व्यवस्था म.रा.सा. आणि स. मंडळ, मुंबई, २००३ पृ. १३—१४.
(९) जोशी श. ना. 'अर्वाचिन महाराष्ट्रेतिहास काळातील राज्यकारभाराचा अभ्यास (१६०० ते १८००), पुणे विद्यापीठ, १९५६ पृ. ७८—७९.
(१०) भावे वा.कृ., पुर्वोक्त, पृ. १२५—१२६.
(११) हेरवाडकर र.वि. (सपा.) पूर्वोक्त, पृ. २३२.
(१२) कित्ता, पृ. २२८,२२९,२३०.